# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे-१

## प्रसिध्दी निवेदन

शासननिर्णय क्र. एफ.ई.डी.-४०१४/६४३/ प्र.क्र.४/एस.डी.-५ दि. २९/०६/२०१५ अन्वये शिष्यवृत्ती परीक्षा इयता ४ थी ऐवजी इयत्ता ५ वी मध्ये व इयत्ता ७ वी ऐवजी इयत्ता ८ वी मध्ये आयोजित करण्याचे निश्चित केल्यानुसार सन २०१६-१७ मध्ये पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता ५ वी ) व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता ८ वी ) मध्ये घेण्यात येणार आहे.

सदर परीक्षेच्या मराठी माध्यमाकरीता शिक्षक, विद्यार्थी व पालकांना उपयुक्त अशी मार्गदर्शिका परीक्षा परिषदेमार्फत तयार करण्यात आली आहे. सदर मार्गदर्शिका पुस्तिकांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | इयत्ता | पेपर | विषय |
|---|---|---|---|
| १ | पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता ५ वी ) | पेपर-१ | मराठी व गणित |
| २ | पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता ५ वी ) | पेपर-२ | इंग्रजी व बुध्दिमत्ता चाचणी |
| ३ | पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता ८ वी ) | पेपर-१ | मराठी व गणित |
| ४ | पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता ८ वी ) | पेपर-२ | इंग्रजी व बुध्दिमत्ता चाचणी |

उपरोक्त पुस्तके महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे किंवा महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाच्या विभागीय भांडारातून (बालभारती- पुणे, गोरेगाव, नागपूर, औरंगाबाद, पनवेल, नाशिक, कोल्हापूर, लातूर व अमरावती भांडार) येथून खरेदी केल्यास छापील किंमतीवर १५% सवलत देण्यात येईल. तरी विद्यार्थी, शाळा यांनी या सवलतीचा लाभ घ्यावा.

तसेच पाठ्यपुस्तक मंडळाच्या सर्व अधिकृत पुस्तक विक्रेत्याकडेही विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

**(रा. वि. गोधने)**
**आयुक्त,**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे - ०१**